# पखरण '20

## पखरण

**संपादक :**
हर्षदा अभ्यंकर

**साहित्य विभागप्रमुख :**
दुर्गा येसादे

**सहाय्य :**
राधा पर्वते

**मांडणी - सजावट :**
स्वरांगी सावंत

पखरण हा अंक मराठी वांङ्मय मंडळातर्फे २१ जानेवारी २०२० रोजी प्रसिद्ध झाला आहे. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकशकाधिन .

अभिप्रायासाठी संपर्क :
pakhran2020.mvmxaviers@gmail.com

## अनुक्रमणिका

१) प्रस्तावना
२) संपादकीय
३) मंडळाच्या सचिवाकडून
४) मुलाखत : डॉ. मोहन आगाशे
५) सेंट झेवियर्स मधील दिवस
६) पखरण
७) महिलांनी घडविला माझा देश
८) मनतरंग
९) जावे लामांच्या गावी
१०) वेश्येपासून प्रख्यात गायिका होण्यापर्यंत चा प्रवास
११) आठवणींच्या राज्यात
१२) एक पत्र : I wish to live that way
१३) क्रूर वाटाड्य
१४) कविता : Create
१५) कविता : Has Draupadi's revenge really been taken ?
१६) ऐक ना रे माझं
१७) संगीतोत्सव
१८) गाभाऱ्यातील दीप एक मी
१९) तुझी माझी जोडी

# प्रस्तावना



लहानपणी गिरकी गिरकी खेळायचो. वर आभाळाकडे बघत, मागे मान टाकुन गर गर गिरकी घ्यायची. मग थांबलो कि समोरचं सगळे जग एकमेकांत मिसळून जायचं. पांढ–यांत लाल, लालमध्ये पिवळा, बिल्डिंगमधे रस्ता, रस्तामधुन ढग सगळं जग उलट पालट होऊन जायचं. अंगणात पारिजातकाचं झाडं होतं त्याला आधार म्हणून धरलं की परत हळूहळू सगळं जागेवर यायचं. सगळं पुर्ववत गिरकी थांबवल्यामुळे व्हायचं की पारिजातकाच्या झाडाच्या आधारामुळे हे त्या वयात कळायचं नाही. जेव्हा शहाणीव आली तेव्हा त्या गरगरण्यातली आणि पारिजातकाला धरण्यातली कविता हरवुन गेली. आयुष्यात काही जगण्याचे क्षण गरगरायला लावतात. तेव्हा काय करावं सुचत नाही. हल्ली अशावेळी आपण आपल्या 'आयतात' हरवुन बसतो. पण त्याने गुंता वाढतो कमी होत नाही. अशा क्षणी 'पखरण' हाती घ्यावं आणि त्यात झालेली पखरण वेचावी. गरगर कमी होईल अशी शक्यता. आता याचा आणि त्याचा काय संबंध असं वाटेलही पण 'पखरण' ने पारिजातकाचं झाड व्हावं ही इच्छा.

आजच्या भाषेत सांगायचं तर वाचन म्हणजे 'बग्ज अपडेट' आहे. आणि लेखन हे आपल्यातलंच आपल्याला माहित नसलेला जिवंत झरा शोधणारं उत्खनन आहे.पखरण च्या निमित्ताने प्रत्येकाने आपापले झरे आणि पारिजातकाचं झाड हुडकावं ही इच्छा.

तुम्ही आस्तिक असाल तर तुम्हाला ठाऊक असेल की मंदीरातला कमंडलु, चर्चमधला बेनेटर किंवा मशिद वा गुरुद्वारातली चादर एका ठराविक दिवशी स्वच्छ केली जाते किंवा बदलली जाते. आणि तुम्ही नास्तिक असाल तर तुम्हाला हे माहित असेल कि रोपाने तग धरण्यासाठी आठवड्याला कुंडीतल्या मातीचा थर वरचे वरचे भुसभुशीत करावा लागतो. जेणे करुन टाकलेलं पाणी खोल मुरत जातं. 'पखरण' हे तो ठराविक दिवस आहे. ह्या उपक्रमात खंड पडु देऊ नका. झेवियर्स आणि त्यांच्या मराठी वाङ्मय मंडळाला अनेक शुभेच्छा.

धन्यवाद.

– प्राजक्त देशमुख

# संपादकीय

नमस्कार!

संत झेवियर्स महाविद्यालयातील मराठी वांग्मय मन्डळ हे गेले ९६ वर्षे कार्यरत आहे. दर वर्षी मन्डळ स्वत:ची तेजोमय आणि पखरण ही दोन मासिके प्रसिद्ध करते. या मसिकांद्वारे तरुण–वृद्ध सर्वपर्यंत उदयोन्मुख साहित्यिकांचे साहित्य पोचवायचे हाच प्रयत्न असतो.

आमोद म्हणजे आसक्त अनंत अमर्यादित आणि ह्या आमोदची शान अधिक वाढवायला पखरण त्याची साथ देते. पखरण म्हणजे नाजूक फुलांचा सडा. पण ह्याचप्रमाणे विचारांचीदेखील एक पखरण ह्या मासिकात शब्दांद्वारे मांडण्यात आली आहे.

मासिकाला कोणतेही बंधन नसून विद्यार्थी हवे ते विचार लेखनाद्वारे मांडू शकतात. पखरण २०२० मध्ये अनेक वेगवेगळ्या लोकांच्या विचारांची पखरण संकलित केली आहे.

देव बाभळीच्या प्राजक्त देशमुखची पखरण, डॉ. मोहन आगाशे यांच्या मुलाखतीचा पखरण, आई–मुलीच्या नात्यातला गोडवा, प्रियकर–प्रेयसीच प्रेम, महान स्त्रीयांच्या बलिदानाचे स्मरण, 'समाज' म्हणजे नक्की काय ह्याची पखरण हे सर्व आम्ही कैद करण्याचा प्रयत्न केला आहे.मासिक वाचकांना नक्की आवडेल आणि स्वत: च्या विचारांची,मतांची पखरण मांडण्यास प्रयत्न करेल हीच आशा.

आमच्या मंडळाचे ४०० हून अधिक सदस्य आहेत. आणि ह्या कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी झालर म्हणजेच पखरण!

सर्वांचे आभार मानत पखरण २०२० आपल्यासमोर सादर करतो. आपला अभिप्राय नक्की कळवा.

-हर्षदा अभ्यंकर (संपादक)
दुर्गा येसादे (साहित्य प्रमुख)

# मंडळाच्या सचिवाकडून

नमस्कारद्य

मी,ऋतुजा पाटील संत झेवियर्स महाविद्यालयातील मराठी वांग्मय मंडळाची वर्ष २०१९-२०२० ची सचिव. सर्वप्रथम मी ९६ वर्ष जुन्या मंडळाची सदस्य आहे आणि महाविद्यालयाने हा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे यासाठी मी आभारी आहे.

मंडळ ही एक परंपरा आहे आणि ही मराठी भाषेची, साहित्याची ज्योत तेवत ठेवणं आम्ही सर्व मंडळातील सदस्य हे एक कर्तव्य समजतो. मंडळ वर्षभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करत असते. ह्या वर्षी मंडळाच्या कारकीर्दीची सुरुवात एका मोठ्य उद्घाटन सोहळ्याने झाली आणि त्याकरता श्री.भरत जाधव आम्हाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. त्यानंतर "संस्कृती न्दचसनहहमक" हा दोन दिवसीय कार्यक्रम मंडळाची नवकल्पना म्हणून प्रेक्षकांसमोर आला. प्रेक्षकांना सुबोध भावे यांनी संबोधले व "प्रिय" नावाच्या वांग्मय मंडळ निर्मित नाटकाच्या प्रयोगास प्रारंभ झाला. वर्षभरात नाट्य, कला,संगीत,नृत्य, साहित्य या सर्व गुणांना वाव मिळावा म्हणून अनेक कार्यशाळादेखील भरवल्या.


सर्व सहकारी व मंडळातील सदस्यांमुळे आमोद २०२० हासुद्धा एक अविस्मरणीय आठवण म्हणून मनात जागा करून गेला. मराठी वांग्मय मंडळ हे एक घर असून आमचे ४०० सदस्यांचे कुटुंब आहे. ह्या कुटुंबाच्या भावना कैदी करणारी मासिकेदेखील म्हणजेच "तेजोमय" आणि "पखरण" लोकांना आवडली आणि नवीन साहित्य वाव मिळाला.

मी माझ्या कोर कमिटीचे आणि विभाग प्रमुखांचे आभार मानते. मंडळाच्या अध्यक्षा अनिता राणे कोठारे यांचेही आभार आणि आमचे मुख्याध्यापक राजेंद्र शिंदे ज्यांनी हा मराठी वांग्मय मंडळाचा रथ तारुण्य नेण्यास नेहमीच प्रोत्साहन दिल त्यांचेही मन:पूर्वक आभार!

सर्व प्रवासात माझ्या पाठीशी उभे राहणारे आई–बाबा यांचेही मी आभार मानते. "पखरण" तुम्हाला खूप भावेल अशी आशा व्यक्त करते.

**– ऋतुजा पाटील**
**(शब्दांकन: हर्षदा अभ्यंकर)**

# मुलाखत : डॉ. मोहन आगाशे



आज मराठी रंगभूमीला १७५ वर्ष पुर्ण होत आहेत. अशा रंगभूमीवरील नटाला जाणुन घेण्यास आम्ही उत्सुक होतो. म्हणून पखरण २०२० करता मराठी रंगभूमी आणि सिनेसृष्टतील नामवंत अभिनेते, लेखक, दिग्दर्शक आणि ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ डॉ.मोहन आगाशे यांच्याशी आम्ही गप्पा मारल्या. त्या गप्पांमधील काही मोलाचे संदेश मुलाखतीत कैद करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी रंगभूमीला १७५ वर्ष पुर्ण होत आहेत, या महत्वाच्या तप्प्यबद्दल तुम्ही काय सांगू शकाल?

मी काहीच सांगू शकणार नाही कारण मी एक नट,अभिनेता आहे. रंगभूमीबद्दल मतं मांडायला मी कोणी थोर संशोधक नाही किंवा समीक्षक तर नाहीच नाही. अशी कितीही वर्षे झाली तरी मी काम केलेच असतेय कारण नाटक–सिनेमा माझ्या रक्तात आहे. रंगभूमीला एवढी वर्षे पुर्ण होत आहेत याचा मला अभिमान वाटतो.

मराठी सहित्यामूळे नाटक,सिनेमा की मराठी नाटक–सिनेमांमुळे साहित्य? तुम्हाला काय वाटते?

हा एक अतिशय चांगला प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर म्हणजे आईमुळे मुले की बाबांमुळे मुले यामध्ये सापडते. दोघेही एकमेकांमुळे आहेत. आज सर्व काही बदलत चालले आहे. फिजिकल थिएटर, एक्सपेरीमेन्टल थिएटर यामुळे नव–साहित्याची निर्मिती होतच आहे. म्हणूनच कोणा एकामुळे नसुन सगळयांमुळे सगळ आहे.

तुम्ही आजवर अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहेत हिन्दी,मराठी,बंगाली अगदी तमिळसुद्धा. ही विविधता जपताना तुम्हाला कधी भाषेचा अडथळा जाणवला का?

मला निर्मात्यांनी कामे दिली आणि सांगितलेला माझा भाग मी पुर्णपणे कष्ट करुन पार पाडला. मला असे वाटते की शब्दांद्वारे भावना व्यक्त करायचे चित्रपट हे एक साधन नाही. ते काम साहित्याचे आहे.

तुम्ही स्वतरू एक मानसशास्त्रज्ञ आहात. आज सिनेमा आणि डॉक्टरकी सांभाळताना कधी असे वाटले का की काहितरी एक मागे पडत आहे?


हो नक्किच वाटले. आपल्या दोन पायांसारखे हेही आहे. चालताना आपला एक पाय पुढे असतो आणि एक मागे. पण आपण ते लगेच बदलतो. मानसशास्त्राचा अभ्यास हा माझा छंद आहे. जे माझे उपजिविकेचे साधन बनले. मी कधीच पैसे कमवायचे म्हणून डॉक्टरकी केली नाही. तर माणसाच्या वर्तणूकीचे कुतुहल आणि वेगवेगळया प्रसंगात माणसाचे बदलते रुप मला मानसशास्त्राकडे घेऊन गेले.

कासव , अस्तू यांसारखे सिनेमे अनेक लोक बघत नाहीत. तुम्हाला असे वाटते का सिनेमा हे आता समाजप्रबोधनाचे नसून केवळ मनोरंजनाचे एक साधन बनले आहे?

आपण एखाद्या गोष्टीचा कसा वापर करतो त्यावर सर्व अवलंबून आहे. आपल्याला सुरीने लोकांना कापुन मारताही येते किंवा सर्जरीही करता येते.

**–हर्षदा अभ्यंकर**

# सेंट झेवियर्स मधील दिवस



साल १९५० यावर्षी मी एस. एस. सी. च्या परीक्षेला बसलो होतो. मे महिन्याच्या अखेरीस कधीतरी परीक्षेचा निकाल लागला होता त्याकाळात कॉलेजात प्रवेश मिळण्यासाठी आजच्या सारखी जीवघेणी स्पर्धा नव्हती. तरीही कॉलेज प्रवेशासाठी सगळीकडेच धावपळी सुरु झाल्या होत्या. याबाबतीत मध्यमवर्गीय वर्तुळात एक अलिखित नियम प्रस्थापित झाला होता. सिद्धार्थ किंवा तत्सम सकाळच्या कॉलेजात प्रवेश मिळवायचा आणि नोकरी करायची हीच मध्यमवर्गीय परंपरा होती. काही सन्माननीय अपवाद असत. पण सर्वसाधारण नियम हाच होता. मी ही याच वर्गात मोडत होतो. सिद्धार्थमध्ये प्रवेश घ्यायचा आणि नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करायचे हेच माझेही स्वप्न होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. एस.एस.सी परीक्षेत चांगले मार्क मिळाले होते. त्यामुळे सिद्धार्थमध्ये आणि तेही आर्ट्स विभागात प्रवेश मिळणे कठीण नव्हते. पण मला काय दुर्बुद्धी सुचली कुणास ठाऊक. मी माझ्या एका ओळखीच्या गृहस्थास याबाबतीत मार्गदर्शन करण्याची विनंती केली. कॉलेजची पायरी चढायची वेळ तोपर्यंत आलीच नव्हती. कुटुंबातील कुणीही कॉलेजात गेले नव्हते. त्यामुळे कुणीतरी अनुभवी व्यक्तिची मदत घ्यावी म्हणून मी त्यांच्याकडे गेलो होतो.

त्या गृहस्थाबाबतचा माझा अंदाज मात्र साफ चुकला. मार्गदर्शन राहिले दूरच. पण त्यांनी चार दिवस त्यांच्या ऑफिसात खेटे घालावयास लावले आणि पाचव्या दिवशी साळसूदपणे मला सांगितले की, तुला सिद्धार्थमध्ये प्रवेश मिळू शकत नाही. "तू असे कर, झेवियर्समध्ये प्रवेश घे, असा अनाहुत सल्लाही दिला. या सर्व प्रकारात माझा संयम सुटत चालला होता तरीही स्वत:ला कसेबसे सावरून त्या गृहस्थांना म्हटले," मला तुमच्या सल्ल्याची गरज नाही. "काय करायचे ते मी स्वत: करीन", असे म्हणून त्या तिरमिरीत मी झेवियर्सच्या वाटेला लागलो. हे कॉलेज कुठे आहे, हे ही त्यावेळेस मला माहित नव्हते. पण विचारपूस करत मी तिथपर्यंत पोचलो. रिझल्ट लागून पाच दिवस झाले होते. पण प्रवेश देणे चालू होते. काऊंटरवरून मी फॉर्म घेतला आणि भरून तिथल्या कर्मचाऱ्याच्या हातात दिला. त्याने मला दुसऱ्या दिवशी मुलाखतीसाठी यायला सांगितले. या मुलाखती प्राचार्य स्वत: घेत असत. त्यावेळी फादर बलागेर हे स्पॅनिश गृहस्थ प्राचार्य होते. मुलाखत यशस्वीरित्या पार पडली. प्राचार्यांनी माझ्या प्रवेशावर शिक्कामोर्तब केले.

मी त्यांच्या खोलीतून बाहेर आलो आणि कॅश काऊंटरवर पहिली टर्म फी भरली आणि सेंट झेवियर्स सारख्या मातब्बर कॉलेजचा अधिकृत विद्यार्थी झालो.

२० जून, १९५० कॉलेज जीवनातील आणि ज्ञानसाधनेचाही पहिला दिवस! नवोदित विद्यार्थी विद्यार्थिनी गटागटाने येत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता. पण त्याचबरोबर जुन्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आपल्या ज्येष्ठत्वाचा आणि श्रेष्ठत्वाचा भावही दिसत होता.

दिवस भराभर जात होते. कॉलेजातील रुटीन वातावरणही आकार घेऊ लागले होते. त्याचबरोबर विविध भाषांच्या वाङ्मय मंडळांचे सांस्कृतिक कार्यक्रमही सुरु झाले होते. तेव्हा मराठी वाङ्मय मंडळाशी आणि त्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाशी संबंध येणे क्रमप्राप्त होते. प्रा. मोरेश्वर पेठे हे या मंडळाचे अध्यक्ष होते तर रमेश चौधरी सरचिटणीस होते. त्यापुढच्या वर्षी मी आणि माझे वर्गमित्र नरेंद्र वागळे सहचिटणीस म्हणून निवडून आलो होतो.

त्याकाळातील आणखी दोन आठवणी इथे सांगावाश्या वाटतात. १९५० पासून पुढच्या काळात लता मंगेशकर या हिंदी चित्रपट सृष्टीत पार्श्वगायिका म्हणून प्रसिद्धीस येऊ लागल्या होत्या. १९४९ साली लिबर्टी सिनेमागृहात लागलेल्या मेहबूब प्रॉडक्शनचा 'अंदाज' या चित्रपटात लताबाईना प्रथमच हिंदी चित्रपटात पार्श्वगायनाची संधी मिळाली होती. अंदाज चित्रपटा पाठोपाठ बरसात आणि महल या चित्रपटातील त्यांनी गायिलेली गाणी खूपच लोकप्रिय झाली होती. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही हे सर्वज्ञात आहे. मराठी वाङ् मय मंडळाच्या एका कार्यक्रमाला त्या प्रमुख पाहुण्या म्हणून येणार होत्या. पण त्याविषयी कॉलेजातील प्रतिक्रिया मात्र निराशाजनक होती. कारण इंग्रजी, उर्दू, हिंदी इ. छोट्यशा भाषिक वाङ् मय मंडळाच्या तुलनेत मराठी वाङ्मय मंडळ अगदीच चिमुकले होते. अशा संस्थेच्या कार्यक्रमाला लता मंगेशकर प्रमुख पाहुण्या म्हणून येणार, यावर कुणीच विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. पण त्या आल्या आणि त्यांच्या येण्यामुळे कार्यक्रम यशस्वी झालाच पण मंडळालाही बाराशे रुपयांचा फायदा झाला. मराठीचे प्राध्यापक मोरेश्वर पेठे हे नाटयप्रेमी होते. नाटयक्षेत्रातील अनेक कलाकार मंडळींशी त्यांचे स्नेहबंध होते. त्यामुळे हे शक्य झाले असावे असे वाटते. काहीही असो पण लता मंगेशकर मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमास उपस्थित राहिल्यामुळे मराठी वाङ्मय मंडळाचा भाव मात्र वधारला होता. त्यानंतरची आणखी एक सांगण्यासारखी घटना म्हणजे अशाच एका कार्यक्रमाला प्रसिद्ध प्रसुती व स्त्रीरोग तज्ञ डॉ. बी. एन. पुरंदरे हे प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यांनी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेसाठी भरघोस देणगी दिली. याच देणगीतून त्यांच्या नावाने ही स्पर्धा सुरु झाली. मला वाटते ती अजूनही सुरु असावी.

सेंट झेवियर्स कॉलेजचे आणखी एक वैशिष्टय मला जाणवले होते. श्रीमंत आई–वडिलांच्या मुलांना कॉलेजमध्ये मौजमजा करण्याचे स्थान असेच वाटत असे त्यांची ही इच्छा पूर्ण करायची संधीही त्यांना या कॉलेजमध्ये मिळत असे. पण त्याचबरोबर मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी प्रामाणिकपणे मेहनत करून आपले व्यक्तिमत्व प्रगल्भ करण्याचे प्रयत्न करीत होते.

आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी, व्यवसाय यशस्वी होण्याचे स्वप्न पाहत असत. त्यांचे हे स्वप्न पूर्ण होण्यासारखे वातावरणही या कॉलेजमध्ये होते.

इंटरच्या (१२ वी) परीक्षेत पास झाल्यानंतर माझ्या पुढच्या प्रवासाला काही अपरिहार्य कारणास्तव ब्रेक लागला. मी दोन वर्ष कॉलेजमध्ये जाऊ शकलो नाही. पण पदवी परीक्षेपर्यंतचा प्रवास पूर्ण करायची इर्षा मात्र कमी होऊ दिली नाही. त्या सर्व संकटांवर मात करून मी १९५४ साली ज्युनियर बी. ए. ला प्रवेश घेतला. यावेळेस आणखी एक नवीन अडचण उभी राहिली होती. बी. ए. साठी तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र हे विषय घेण्याचे अगोदरच ठरले होते. त्यामुळे अर्जात मी तसा उल्लेख केला. फादर मेंडोसा हे या विभागाचे प्रमुख होते आणि या विषयाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांला त्यांच्या अनुमती शिवाय प्रवेश मिळत नसे. त्यांच्या या नियमाप्रमाणे मलाही मुलाखतीसाठी बोलावले. त्यांच्या रुममध्ये गेल्यानंतर त्यांनी मला पहिला प्रश्न विचारला, तुझ्या पदवी परीक्षेसाठी हे विषय तू का निवडलेस? मी काहीसा बावरलो. काय उत्तर द्यावे हे क्षणभर मला कळले नाही. पण त्यांनी निक्षून सांगितले की, या प्रश्नाचे उत्तर दिल्याशिवाय तुला प्रवेश मिळणार नाही तू इतर कुठलेही विषय घेऊ शकतोस. त्याक्षणी मला १९४३ सालची एक घटना आठवली. रायगड जिल्ह्यात कोकण एज्युकेशन सोसायटी या संस्थेतर्फे अनेक शाळा चालविल्या जातात. १९४३ साली या संस्थेची रजत जयंती रोह्याला साजरी होणार होती. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते या समारंभाचे उद्घाटन होणार होते. इंग्रजी भाषेवर विलक्षण प्रभुत्त्व आणि तत्वज्ञानाचा विषय ही त्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या उद्घाटनपर भाषणात ते जाणवत होते. १३ वर्षाचे ते वय आणि इंग्रजी भाषा शिकायला नुकतीच केलेली सुरुवात एवढया भांडवलावर त्यांचे भाषण आणि त्यांचे विचार समजणे शक्य नव्हते. परंतु, त्यांच्या त्या प्रभावी व्यक्तिमत्वाने मी भारावून मात्र गेलो होतो. त्याक्षणी मनात विचार आला की एस. सी. झाल्यावर यदाकदाचित कॉलेजमध्ये गेलो तर पदवी परीक्षेसाठी मी तत्त्वज्ञान हा विषय घेईन आणि त्याप्रमाणे मी या विषयासाठी प्रवेश मिळावा म्हणून मी अर्ज केला. हा सगळा प्रसंग मी फादर मेंडोसान सांगितला. आश्चर्य म्हणजे पुढला कुठलाही प्रश्न न विचारता त्यांनी मला पदवी परीक्षेसाठी तत्त्वज्ञान हा विषय घेण्यास अनुमती दिली.

बी. ए. ची पदवी इतर कुठल्याही कॉलेजमधून मिळाली असती परंतु ज्ञानाबरोबर व्यक्तीमत्वाची जडणघडण करण्याचे जे संस्कार या कॉलेजात झाले ते अधिकच महत्त्वाचे होते असे आजही वाटते. भारताला स्वातंर्त्य मिळून दोन–तीन वर्षेच झाली होती. भारत लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र झाले होते. पण लोकशाही म्हणजे केवळ शासन पद्धती नव्हे ती एक जीवनशैली असते आणि या जीवनशैलीचा स्वीकार सामान्यजनानी केल्याशिवाय लोकशाही शासन पद्धती यशस्वी होऊ शकत नाही. या जाणीवेतून तसे संस्कार करण्याचे विशेष प्रयत्नही कॉलेजमध्ये करण्यात येत असत. आजची आपल्या देशातील एकूण राजकीय परिस्थिती पाहता अशा संस्कारांची किती आवश्यकता आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

माझ्या कॉलेज जीवनातील अशा अनेक आठवणी सांगण्यासारख्या आहेत. परंतु, स्थलाभावी हे शक्य नाही. म्हणून कुठेतरी थांबावे लागते. पण इथे थांबता थांबता माधव जुलियन यांच्या "तुझे जेव्हा जेव्हा सहज मजला दर्शन घडे द्य स्मृतींचे पूर्वीच्या फलक पुढती राहती खडे, या काव्यपंक्ति आठवल्या. त्यांना त्यांच्या शालेय जीवनातील आठवणी येत होत्या. मला मात्र माझ्या कॉलेज जीवनातील त्या मंतरलेल्या दिवसांची आठवण येत होती.

एवढाच काय तो फरक!

**.अब्दुल कादर मुकादम**
**सामाजिक व राजकीय विश्लेषक व मुक्त पत्रकार**



# पखरण

हॅल्लो बडीज, सगळ्यांना नविन वर्षाच्या खूप शुभेच्छा!! मला झेवियराईट होऊन आता सहा महिने होत आलेत, आणि ह्या पाच सहा महिन्यात इतक्या उत्तम नि छान गोष्टींनी माझं आयुष्य व्यापलं की मग आनंद व्यक्त करायला, तुमच्याशी संवाद साधायला हे एक मस्त माध्यमदेखिल मिळालं म्हणुन हा प्रयत्न बरं!

'पखरण' ह्याबद्दल जेव्हा काही लिहा असं आवाहन झालं तेव्हा कुठून सुरुवात करावी हे कळेनास झालं, पण तरीही माझ्या त्रोटक शब्दात मी शब्दांची पखरण करायचा एक प्रयत्न करते.
पखरण म्हणजे हळुवार अलगद घरंगळणे, अगदी पहाटे प्राजक्ताचा सडा पडतो तसे. म्हणजे पारिजातकाच्या अंगाखांद्यावरुन, फुलांचे अलगद जमिनीकडे झेपावणे इतके हळुवार की प्रत्यक्ष झाडाला सुध्दा ते कळु नये! आपल्या स्पॉनटॅनियस विचारांसारखच असतं ते! क्रिएटिव्हीटी सुद्धा अशीच स्पॉनटॅनियसच असते...
कुठलीही कलाकृती घडतांना कलाकाराच्या मनातल्या विचारांना, मेंदूतुन मिळालेल्या डायरेक्शनची पखरण होतांना जे काही घडतं ती केवळ त्याच्या साधनेतुन घडते असं नाही तर परमोच्च आनंदाचा केंद्रबिंदू असते ती कलाकृती!

झेवियराईट झाल्यापासुन कौतुकाची पखरण होण्याचे कैक प्रसंग मी आठवणींच्या कुपीत बंदिस्त केलेत. युमाईंड, संस्कृति अनप्लग्ड मधील क्षिरजाज् क्रिएशन्स चं पार्टिसिपेशन, वोलॅन्टस, आणि इंटरकॉलेज फेस्टस् अशी सुंदर आठवणींची शृंखला, जीवनाच अंग बनुन गेली.
"सायंसचा अभ्यास सांभाळुन इतकं सगळं छान करतेस" असं जेव्हा टिचर्स, फ्रेंड्स म्हणतात तेव्हा ती कौतुकाची पखरण जबाबदारीचं भान देऊन जाते आणि नव्या जोमाने काम करण्याची उर्जा देऊन जाते.
नृत्य, पेंटिंग, पेपर क्विलींग, क्रिएटिव्ह रायटिंग, ह्या माझ्या ऑबसेशन्स ना कोण प्रथम आणि कोण नंतर हे मी सांगूच शकणार नाही.. मग अशावेळी आई म्हणते की प्रायॉरिटाईज करं! स्वत:वर अजून खूप काम करणं बाकी आहे.

'क्षिरजाज् क्रिएशन्स' ने मला खूप वेगळं विश्व दाखवलं. केवळ कलेचं कौतुक नव्हे तर मदतीचा एक छोटासा प्रयत्नसुद्धा किती लाखमोलाचा असतो त्याची जाणिव होत गेली.

देवाच्या कृपेने आपण जिथे जन्म घेतो ते कुठल्याही बालकाच्या हातात नसतं तर ते त्याच दैव असतं , मग ते सुदैव का दुर्दैव ते त्याला मोठं झाल्याखेरिज कळत नाही.

रस्त्याच्या एका बाजुला, भव्य टोलेजंग इमारतीत, सधन कुटुंबात जन्मलेल्या बाळाचं भवितव्य सुखवस्तू नि उज्वल..तर त्याच रस्त्याच्या दुस—या बाजुला असलेल्या झोपडीत जन्मलेल्या बाळाचं आयुष्य रोजची भाजीभाकरी मिळेल का नाही ह्या चिंतेच्या गर्तेतलं!

मग अशा गरजूंना एक मदतीचा हात, शिक्षणासाठी मदत हे क्षिरजाज् क्रिएशन्स चं एक एम होऊन गेलं.आपल्याला मिळालेल्या सुखाच्या झ—यातील काही तुषार आपण ह्या अंडरप्रिव्हीलेज्ड वर शिंपिले तर त्यांच्यावर सुद्धा आनंदाच्या क्षणांची पखरण होईल नाही का?

समाजाचं आपण काही देणं लागतो व तो समाज वैचारिक दृष्ट्या सुदृढ व्हावा असं वाटत असेल तर आपल्या प्रत्येकाचं हे कर्तव्य आहे की आपण त्यासाठी हातभार लावावा.तो आर्थिकच हवा असे नाही तर आपला वेळ सुद्धा त्याकरिता देणे हे ही महत्वाचे ठरते.

माझ्या आयुष्यातले हे असे अनमोल क्षण व्यक्त करतांना खूप छान वाटलं! आणि तुम्हा सर्वांना पुन्हा नविन वर्षाच्या, नव्या संकल्पनांच्या पूर्ततेच्या शुभेच्छा!

**-क्षिरजा राजे**
**११ वी विज्ञान शाखा**

# महिलांनी घडविला माझा देश



*तिच्या हाती पाळण्याची  दोरी ती जगा उद्धरी !*

आपल्या भारत देशात अनेक अशा स्त्रियांनी आपली चूल व मूल सांभाळत असे काही प्रचंड करून दाखवत भारताच्या निर्मळ संस्कृतीकडे बोट दाखवणाऱ्यांचे तोंड जसे काही बंदच केले आहे.
भारत देशाचे मोहणारें  सौंदर्य, जीवन व संस्कृतीकडे बघण्याचा शुभ्र दृष्टिकोन, आकर्षित विविधता, स्वच्छ— सुंदर व खोलवर विचार करणारे आणि दूरदृष्टी राखणारे मन पाहून नेहरूंनाही पटलेच कि 'भारतभूमी स्त्री रूपातच शोभते आणि तिला एका आईचीच भूमिका साजेशी ठरते'.

शिवाजी सारख्या राजाचे गुण गाताना हे विसरू नये कि जिजाऊ सारख्या मातेने त्यांना घडविले, रामाची भक्ती करताना कौशल्याची माया व सीतेचे प्रेम विसरू नये, हनुमानाच्या ताकदी पुढे अंजलीची श्रद्धा कमी लेखू नये . ज्ञानेश्वरांचा हट्टीपणा दूर करण्यास एक मुक्ताईचं हवी असते.

भारतावर हुकुमशाही गाजवणारी राणी व्हिक्टोरिया कुठे ही स्त्री म्हणून कमी पडली नाही, तर तिच्या तावडीतून भारताला स्वतंत्र करण्यात भारतीय महिला कधीही घाबरल्या नाहीत. झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, आनंदी गोपाळ यांनी क्रांती घडविली, तर त्यांनी पेटवलेली मशाल हाती घेऊन इंदिरा गांधींनी आणीबाणीतील वातावरण हुशारीने सांभाळले. एकी कडे आहे कालीचे भयंकर रूप तर दुसरीकडे मदर तेरेसाची निर्मळता, हीच स्त्रीची खरी ताकद. तिच्या मनगटात चार हातांचे बळ, घुंगटा मध्ये लपलेली चतुर बुद्धी स्वातंत्र चळवळीत तिच्या काजळाने भरलेल्या डोळ्यात देखील आग होती स्वातंत्र्याची आणि  पैजनींच्या छुमछुम आवाजात नाद होता स्वराज्याचा. म्हणून म्हणतात 'दशपुत्रसमा कन्या।' एक कन्या दहा पुरुष्यांच्या समान आहे.

ह्या सगळ्यांचा आदर्श घेत, आजही क्रीडा क्षेत्रातील पी. व्ही. सिंधू व मेरी कॉम असो, अंतराळातील कल्पना चावला, नवसेनेतील तारिणी, अवकाशातील अवनी चतुर्वेदी, समाजसेवेतील मंदाकिनी आमटे किंवा उद्योग क्षेत्रातील इंद्रा नुरी आणि करमणूक क्षेत्रातील प्रियांका चोप्रा, ह्या सगळ्या भारताचा तिरंगा समुद्रा पार उंचावत आहेत.

अहो एवढेच नव्हे, तर आपल्या स्वत:च्या आई कडे ६ बायको कडे एकदा पाहा, तिच्या दिनचर्येचे निरीक्षण करा, तुम्हाला कळून चुकेल की तीच गृहमंत्री, तीच अर्थमंत्री आणि स्वच्छता व बाल विकास खाते ही तिच्याच स्वाधीन आहे, आणि नकळत अश्याच "सुपरवूमन" सोबत तुम्ही एवढी वर्षे घालवली. पुरुष आपले आयुष्य ऑफिस व व्यवसायात घालवू शकतात, परंतु एका स्त्री कडे कौटुंबिक सामर्थ्य असतं. तिने घर, चूल व मूल सांभाळत ऑफिस किंवा व्यवसाय ही यशाच्या शिखरावर नेऊन दाखवले आहे. खरंच तिच्याकडे दुर्गेची शूरता, लक्ष्मीची श्रीमंती, सरस्वतीची विद्या, यशोदेची माया, कालीची ताकदय सर्व काही आहे. ती एकाच वेळी एका मुलीची, बहिणीची, मैत्रिणीची, पत्नीची, आईची, सुनेची,सासूची आणि आजीची भूमिका निभावत असते आणि ती नेहमी हीच इच्छा बाळगते कि ती कुठेही कमी पडू नये. एवढे कर्तव्य निभावून ही तिच्यावर होणारे अत्याचार कुठे ही कमी होत नाहीत. गर्भापासून मरणापर्यंत सगळे तिच्या सहनशीलतेचा अंत पाहत असतात. स्त्रीभ्रूणहत्या, बलात्कार, बालविवाह,अत्याचार, मारहाण, ॲसिड हल्ला, छेडछाड सारख्या कारस्थानांना ती माउली बळी पडते. तिचा अंत पहिला जातो, तिचे पाय खेचले जातात. रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या वाईट नजरेच्या राक्षसांमुळे तिला करिअरचा त्याग करावा लागतो. आणि सत्य तर हे आहे कि ह्या घटनांना कुणीही वाली नाहीय ना पोलीस, ना न्यायव्यवस्था, तिची लढाई कदाचित तिला एकटीलाच जिंकायची आहे.

आजची स्त्री पुरूषांच्या तुलनेत कुठे ही मागे नाही, कमी नाही आणि लहान ही नाही. ती तेव्हाही आणि आजही पुरुष्यांच्या बरोबरी ने पाऊल टाकत, देश घडवीत आहे, माती साठी तिने ही तेवढेच त्यागले, तेवढेच गमावले, तेवढेच सहन केले. परंतु आजही "महिला विकास" संघटना चालवून पुरुषवर्ग तिला कमी लेखत आहे. अहो, तिला विकासाची नाही संरक्षणाची गरज आहे. त्या काळात तिला शिक्षणापासून वंचीत ठेवून ही आज तिने शिखर गाठले आहे.

एकी कडे एक स्त्री देशाचा संपूर्ण आर्थिक व्यवहार सांभाळत आहे तर दुसरी कडे एक मोठी कार्यालये चातुर्याने सांभाळत आहे. तिच्यातच दोन कुटुंबांना जोडण्याची जादू आहे. ती धीट आहे, सक्षम आहे परंतु आपल्यांकडूनच होणारे अत्याचार सहन करण्याची ताकद तिच्याकडे नाही. कदाचित आपण विसरलो आहोत :

*यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रामयंते तत्र देवता: ।यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्रफला: क्रिया: ॥*

अर्थात जिथे स्त्रीचा सन्मान होतो, तिथे पवित्रता निर्माण होते. परंतु जिथे स्त्रीला मान नसतो तिथे कितीही प्रयत्न केले तरी अपवित्रताच नांदते.

तिला थोड्या विश्वासाची अपेक्षा आहे, नाहीतर तसेही एक कृष्ण सांभाळायला एक यशोदा ही तेवढीच सक्षम आहे, विज्ञानाची मेहेरबानी आणि टेस्टट्यूब बेबी ची किमया. जेवढे बळ तुम्ही तिच्या पदरी घालाल, तेवढाच सामर्थ्यवान देश घडविताना पाहाल. ह्याच स्त्रियांचा मी आदर्श राखते आणि मानते कि त्यांनीच माझ्या देशाला दिशा दिली, प्रेम व माया दिली आणि ऊंच शिखरावर नेऊन पोहोचवले आहे.

*'न स्त्रीरत्नसम रत्नम।'*

**-ऋतुजा अमरे**
**प्रथम वर्ष, कला शाखा**



# मनतरंग

आज पर्यंत मला 'मन' नाही असं म्हणणारा एकही माणूस दिसला नाही. कारण मन म्हणजेच माणूस! मनाशिवाय माणसाचं जणूकाही अस्तित्वच नाही. मात्र एखाद्याच्या मनात कधी काय चालू असेल हे सांगता येत नाही! कारण कधी कधी आपण एकानठिकाणी असतो आणि मन मात्र जगभर फिरून येतंय कधी कधी तर भूतकाळ आणि भविष्यातही डोकावून बघतं. आपल्याला मनाचं अस्तित्वप्रत्येक गोष्टीमध्ये दिसतं पण ते दाखवता येत नाही. ज्याप्रमाणे आपण मेंदू–हृदय दाखवू शकतो तसं मन मात्र अजून कोणालाच दाखवताआलं नाही. काय कारण कित्येक जणांना 'मन' म्हणजे काय हे समजलंच नाही. आणि म्हणूनच त्यांना 'त्यांची'ओळख पटत नाही. कारण जोपर्यंत आपण एखाद्या माणसाचं मन ओळखत नाही तोपर्यंत आपल्याला तो माणूसच समजत नाही.

प्रत्येक माणूस वेगळा आहे कारण प्रत्येकाच्या मनाच्या वेगवेगळ्या छटा आहेत. ह्या मनात येणारे विचार वेगळे आहेतय आवडणाऱ्या–नावडणाऱ्या गोष्टी वेगळ्या आहेतय गोष्टींकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. आपल्या मनाचा जणू आपल्या प्रत्येकगोष्टीवर,हालचालीवर ताबा असतो. "मन मारून अभ्यास केला!", "मनासारखं शॉपिंग केलं" इथपासून "माझ्या मनात आलं म्हणून मीकेलं" इथपर्यंत प्रत्येक भावनांवर–ईच्छांवर मनाचा ताबा असतो. म्हणताताना, हे मन हिटलर असतं. मनामध्ये नाही म्हटल्यावर आपणप्रत्येक गोष्टीकडे वेगळ्याच नजरेने पाहायला लागतो. जिथे मनाची साथ नाही तिथे आपण काही करूच शकत नाही. आणि म्हणूनच एखाद्याच्या मनामध्ये तबला–बासरीची मैफिल चालु असताना त्याचे गणितामध्ये लक्ष लागणं शक्यच नाही.

मात्र कधीकधी आपल्यालासुद्धा मनावर ताबा ठेवायला लागतो. कधी आर्थिक सामाजिक ते कधीही सांस्कृतिक बंधनांमुळे आपण 'मन के घोडे पे सवार' होत नाही. मात्र कधी कधी हा ताबा आपलं मानसिक संतुलन बिघडवतो. कारण मनाला बांधून ठेवलेल्या चालतनाही. त्याला कोणतीही बंधने घातलेली चालत नाहीत कधी भूतकाळात तर कधी भविष्यात कधी चांगल्या विचारात तर कधी वाईट आठवणींमध्ये मनाला फेरफटका मारायला खूप आवडतं. म्हणूनच कधी कधी मन मोकळ केल्यावर खूप बरं वाटतं. मनावर ताबा म्हणजे आपण मनाविरुद्ध करायचं बघतो. तर आपण वाळवंटात हरवल्यासारखे अजूनच भरकटत जातो. म्हणूनच यावर सोपा उपाय म्हणजेमनान सारखं जगणं आपण एखादा दिवस कसाही घालवू शकतो पण तोपर्यंत आपण तो दिवस मनापासून घालवत नाही पर्यंत तोआपण जगत नाही.


आणि हा बघू अंगी मनाच्या छटा जपल्या टिपण्यासाठी महिन्याभरापूर्वी मी "psyaart_19" नावाचं इंस्टाग्राम पेज चालू केलं. कधीफोटोग्राफी, कधी चित्रकला, तर कधी क्राफ्टच्या माध्यमातून माझ्या मनाला समजण्याची ही माझी धडपड कधी संपेल माहिती नाही. मात्र तुम्हीसुद्धा संगीताच्या—नृत्याच्या—लिखाणाच्या—अभिनयाच्या माध्यमातून तुमच्या मनाला शोधू शकता. मग करताय ना मनापासूनप्रयत्न?

**-राधा पर्वते**
**प्रथम वर्ष , कला शाखा**


NATURE WALK
CHARITABLE TRUST

Nature WALK Charitable Trust

FOR WILDLIFE SOUVENIR




*Product Range Includes*
- T Shirts with Wildlife Images / Paintings
- Wildlife Caps & Hats
- Key Chains
- Bags
- Mugs with wildlife images
- Wildlife Jackets

*Also contact us for Wildlife Safaris / Camps*
**Naturewalk Outdoors**
A-10, Ashok Kiran Soc., Ashok Path, # Law College Rd, Erandawane, Pune 411 004.
8007976337 / 9405435393 / 9326823052 naturewalkoutdoors@gmail.com / naturewalkoffice@gmail.com
www.naturewalkoutdoors.com

# जावे लामांच्या गावी...

सहावीची वार्षिक परीक्षा संपली आणि आमची लेह लडाख ला जायची तयारी सुरू झाली.तेथील शून्य अंश सेल्सिअस पेक्षा कमी असणारं तापमान पाहून आई तर घाबरलीच होती.त्यामुळे आम्ही लडाखला जायच्या आधी डॉक्टरांची यात्रा करून यायचं ठरवलं. डॉक्टरांनी मिठाच पाणी, गोड किंवा आंबट गोळ्या बरोबर ठेवण्यास सांगितल्या होत्या.

मे महिन्याचे दिवस होते. मुंबईवरून उड्डाण घेतलेलं आमचं विमान लेहच्या विमानतळावर उतरायच्या तयारीत होतं. जसं जसं विमान खाली यायला सुरुवात झाली, तशी तशी बर्फाची चादर अंगावर पांघरलेल्या पर्वतांनी आम्हांला दर्शन द्यायला सुरुवात केली.पण विमानतळावर उतरल्यावर वाळवंटात उतरल्यासारखं वाटलं कारण आजूबाजूला वाळू होती. अत्यंत छोटं असं ते विमानतळ होतं. मुंबईसारख्या गजबजेल्या ठिकाणावरून लेह लडाख सारख्या शांततेच्या ठिकाणी आल्यावर मिळणारी मानसिक शांती जाणवली.लेह म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्ग. जिथे नजर जाईल तिथे विपुल सौंदर्य.

अत्यंत नम्र, स्वच्छता प्रिय अशा लामा लोकांची इथे वस्ती आहे. आमच्या निवासस्थानी उतरल्यावर त्यांनी आमचे आदरातिथ्य केले व आम्हांला राहायला खोली दिली.पण खोलीत चप्पल काढून पाय जमिनीवर ठेवणार तितक्यात गेली ना शिरशिरी पायापासून डोक्यापर्यंत! नाश्त्यासाठी खाली उतरल्यावर तेथे टोमॅटो सूप, चीली सूप, ब्रेड बटर , पनीर होते.थंडी जास्त असल्याने तिथे सूप हा ठरलेला प्रकार असायचा.मोमो हा तिकडचा लोकप्रिय पदार्थ होय. अनेक तिबेटी आणि लडाखी पदार्थांचा आस्वाद तिथे घेता आला.

तिथे आम्ही अक्षरश: रंगीत खडूंच्या पेटीतील खडूंप्रमाणे सजलेले पर्वत पाहिले.येथे बौध्द धर्माचा पगडा असल्याने आध्यात्मिक पार्श्वभूमी पण या ठिकाणाला लाभली आहे.रायसी फोर्ट, रॉयल पॅलेस, पयांग, लिकीट, स्पिटुक, थिकसे यांसारखे अनेक प्रसिद्ध बौध्द स्तूप आम्ही पाहिले.तिथे असणारे शांतिस्तुप हे अत्यंत नयनरम्य असे ठिकाण आहे.तेथील पायऱ्या चढून वर गेल्यावर पाहिले तर,सैन्याची अनेक हेलिकॉप्टर्स वर फिरत होती.

पुढच्या दिवशी आम्ही पंगोंग लेकला गेलो.लदाखहून हे सरोवर घ´ऽ किमी दूर आहे.तेथील वाळू ही सोनेरी होती.सबेरीयन क्रेन या पक्ष्यांचे दर्शन तिथे झाले.या दुर्मीळ पक्ष्यांच्या प्रजोत्पादनाची ही जागा आहे असे मानले जाते.याच ठिकाणी ☒ इडिओट्स' या चित्रपटाच्या शेवटच्या सीनचे शूटींग झाले होते.तेथील मनोहर परिसर पाहून स्वर्गातील नदीच इथे वाहत आहे की काय असे मला वाटले.भारत व चीनला जोडणारी ही नदी आहे.त्या नदीचे स्फटिकासारखे पाणी पाहून डोळे दिपलेच.तिथेच आम्ही तंबूत दोन दिवस राहिलो.

तेथूनच आम्ही नुब्रा व्हॅली कडे प्रयाण केले.तिला ☒व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' असेही म्हटले जाते.तेथील दोन मदारी असणाऱ्या उंटांची सफारी पण मी केली.तिथेच☒ डिसकीत गुंफा' म्हणून एक गुहा आहे.त्यात बुद्धांचा हिं मी उंचीचा सुवर्णपुतळा आहे.संध्याकाळची वेळ असल्याने सुसाट वारा वाहत होता.तेथील चंदेरी वाळू सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.तेथील छोट्यशा नदीवर पलीकडे जाण्यासाठी एक पूल बांधला होता.याक हा तेथील केसाळ प्राणी.पण इथे याकवरची सफारी केली जात नव्हती.येथूनच पुढे लेह चुंबकीय क्षेत्र लागतं.हे पर्यटकांचं अत्यंत आवडीचं ठिकाण आहे.

संध्याकाळच्या वेळी आम्ही खरेदीला जायचो.थंडी व ऊन यांचा संगम इथे झालेला असतो.त्यामुळे स्वेटर घालावा की काढून टाकावा असा यक्षप्रश्न इथे आल्यावर पडतो.धातूंच्या शिल्पाकृती, पेंटिंग्ज, पशमीना शाली येथे प्रसिध्द आहेत.हेमीस आणि लोसार हे सण इथे अत्यंत लोकप्रिय आहेत.हिमालयाची बर्फाच्छादीत शिखरे, दर्याखोऱ्यांचा आणि मधेच असणारा सपाट प्रदेश,नद्यांचे खळखळणारे प्रवाह, त्या भोवतालची हिरवाई, पारदर्शी निळे पाणी पाहतांना एखाद्या वेगळ्याच विश्वात हरवून गेल्यासारखं वाटत होतं.

हळूहळू परतीच्या प्रवासाची वेळ येऊन ठेपली.मुंबईला परतण्याची इच्छा होत नव्हती, पण घरच्यांची आठवण ही यायला लागली होती.तसेच एके दिवशी पहाटे विमानात बसलो आणि मनातल्या मनात त्या प्रदेशाला डोळयांत भरून परतीच्या प्रवासाला सुरुवात केली .त्याच वेळेस आशा भोसलेंच गाणं मोबाईलवर सुरू झालं-☒ही वाट दूर जाते,स्वप्नामधील गावाँ"

*-तीर्थांगी विजय कुलकर्णी*
***११वी, कला शाखा शाखा***

# वेश्येपासून प्रख्यात गायिका होण्यापर्यंतचा प्रवास


रोहिणी आणि मोहिनी या दोन जिवलग मैत्रिणी होत्या. शाळेत असल्यापासून त्या दोघी एकत्रच येत जात असत. मोहिनी ही नावाप्रमाणेच दिसायला सुंदर, देखणी आणि रुबाबदार होती. शाळेतील मुले देखील तिचे हे मोहक आणि सुंदर रूप पाहून तिच्या मोहात पडू लागली. पण दिवसेनदिवस मोहिणीत होणारे बदल पाहून तिचे मित्रमंडळी संभ्रमात पडू लागली. ती सगळ्यांसोबत मुलासारखा व्यवहार करत असे. इतकंच काय तर तिचे चालणे बोलणे व इतर सगळ्या हरकती मुलाप्रमाणे असतात असे तिला तिच्या आप्तेष्ठांनी सांगितले. हे ऐकून ती फार खचली.

एकेदिवशी तिने आईला प्रश्न केला, ''आई मी नेमकी कोण आहे गं'' मुलगा की मुलगी?''
तिचा प्रश्न ऐकताच आई एक क्षण स्थब्ध झाली. पण तिने पुन्हा विचारले, ''आई सांग ना गं आज जर मला कळलं नाही तर मी माझ्या आयुष्याची दिशा कशी बरं ठरवणार?'' काही क्षण थांबून तिची आई म्हणाली, ''तू पूर्ण मुलगा देखील नाहीस आणि मुलगी देखील'' नाहीस म्हणजे तू एक,'' ती लगेच उद्‌गारली, ''म्हणजे मी एक किन्नर आहे, हो ना.''
''हो'' तिची आई म्हणाली.
आईने इतकं मोठं सत्य आपल्यापासून लपवले हे कळल्यावर ती खूप दुःखी झाली. घरात तिला मिळणारी दुय्यमतेती वागणूक, आणि भावंडांमध्ये थोरली असून देखील तिचा दरवेळी होणारा तिरस्कार या गोष्टींशी ती पूर्णतः अवगत होती.

तिने घर सोडण्याचा निर्णय घेतला. ती घर सोडून गेल्यानंतर तिच्या जीवाची अधिकच फरफट होऊ लागली. शाळेत तिच्याविषयी चे सत्य कळल्यावर तिची सगळ्यात जिवाभावाची मैत्रीण रोहिणीने देखील तिची साथ सोडली.

मित्रहो, सावरकर म्हणतात, ''मेल्या परी काय बसूनि ठेला'' अगदी याच म्हणीचे अवलोकन करून तिने संकटांवर मात करण्याचा निर्णय घेतला.
कितीही संकटे आली तरीही शिक्षण सोडायचं नाही असा निर्णय तिने घेतला. शिक्षण घ्यायचे म्हणजे पैसा हवाच आणि तो कमावण्यासाठी काम करणे भाग होते.

# काही अविस्मरणीय क्षण



मराठी वाङ्मय मंडळाच्या उदघाटन सोहळ्याला भरत जाधव प्रमुख पाहुणे म्हणून लाभले



तेजोमय अंकाचे प्रकाशन सुबोध भावे यांच्या हस्ते



विविध दिग्गजांबरोबर संस्कृती Unplugged मध्ये चर्चासत्र

# काही अविस्मरणीय क्षण




प्रिय ह्या नाटकातला एक क्षण



अभिरुची कार्यशाळा लावणी



ऋतुजा बागवे बरोबर नाटक आणि नवरस
याची कार्यशाळा

काहीही झालं तरीही भीक मागायची नाही असे तिने मनाशी पक्के केले होते.
मग दुसरा पर्याय काय असणार? याचाच ती विचार करत होती. जॉब करायचा म्हटलं तरी अजून पाहिजे तसे शिक्षण झालेले नाही, आणि सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न हा होता की, आपल्या सारख्या किन्नर व्यक्तीस कोणी काम देईल का?
अशा असंख्य अवघड प्रश्नांनी तिच्या मनात थैमान माजले होते.

बस्स आता खूप झालं. शिकायचे असल्यास पैसा हा लागणारच आणि त्यासाठी काहीही करावं लागलं तरी चालेल असा निश्चय तिने केला. देहविक्रीच्या बाजारात जायचं, नाचायचं आणि पुरुषांची हौस भागवायची असे तिने ठरवले. ठरल्याप्रमाणे ती दररोज तिथे जात असे. गाणे गायचे पुरुषांची शारीरिक हौस आणि पैसा कमवायचा हीच तिची दिनचर्या. अशा अति त्रस्त जगण्याचा तिला विट आला होता. शिक्षणाकडे दुर्लक्ष होत होते.

पण म्हणतात ना जेव्हा आपुलकीची वाटणारी सगळी दारे बंद होतात तेव्हा एक नवे दार नक्कीच उघडते. आणि ते दार उघडलं तिच्या शिक्षकांच्या रूपात. रोकडे मास्तर हे शिक्षक शाळेत संगीत शिकवत असत. तिने सरांना तिच्या परिस्थितीबाबत आणि एकंदरच आपण किन्नर असल्यानं तिच्या सोबत दररोज घडणाऱ्या घृणास्पद गोष्टींची कल्पना दिली. सर काय म्हणतील याचा विचार ती करतच होती, पण तिच्या सरांनी तिला जवळ घेतलं आणि तू माझ्या मुलीसारखी आहेस त्यामुळे तुझ्या संपूर्ण शिक्षणाचीच काय तर भविष्याची जबाबदारी माझी असेल असं ते म्हणाले.
हे ऐकून तिला धीर आला.

कोणाला तरी आपली काळजी आहे हे पाहून नाउमेद वाटत असलेलं जगणं उमेद प्रकटल्याने आनंदानं बहरले. सरांनी तिला त्यांच्या सार्वजनिक कार्यक्रमात गाण्याची संधी दिली. ती आता दररोज नित्य नियमाने सराव करत असे. त्याचे उचित फळ देखील तिला मिळू लागले. दररोज कार्यक्रम मिळू लागले. पैसे देखील मिळू लागल्यानं आर्थिक चणचण थांबली. एक वेश्या आज एक प्रख्यात गायिका झाली होती. शिक्षकांच्या पाठिंब्याने किन्नर व्यक्ती देखील खूप काही करू शकतात हे तिने साऱ्या जगाला दाखवून दिले होते.

वेश्येपासून एक प्रख्यात गायिका होण्यापर्यंतचा प्रवास हा जरी खडतर असला तरी शेवट छान झाला होता. किन्नर व्यक्ती या देखील समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहेत आणि त्यांना देखील समान न्याय व वागणूक मिळायला हवी हेच तिला समाजाला पटवून द्यायचे होते.
मित्रहो, मोहिनीच्या पाठीशी तिचे सर जसे भिंतीसारखे उभे होते त्यामुळेच मोहिनी एक प्रख्यात गायिका झाली.

त्याचप्रमाणे आपण देखील तृतीयपंथी समाजाच्या उद्धाराकरिता सज्ज होणे गरजेचे आहे.

हेच मला आपणा सर्वांना या कथेतून सांगायचे आहे.
धर्म, पंथ, जात सारे समान मानूया।
अन एकतेचा देऊ मंत्र।।
शेवटी माणुसकी हाच आहे।
आपला प्रमोधर्म।।

टीप:
ही कथा माझी स्वरचित असून काल्पनिक आहे, आणि काल्पनिक असली तरी वास्तवदर्शी रूप आपणा समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**-निखिल कोलते**
***प्रथम वर्ष , कला शाखा***

# आठवणींच्या राज्यात



''अगं कार्तिकी काय झालय एवढं हसायला'',आईचा आवाज आला आणि मी भानावर आले. आज अचानक मी लहानपणी एकदा पडले तो किस्सा आठवला. आणि दुसऱ्या क्षणी डोक्यात काहीतरी वेगळाच विचार...तो सुध्दा एक किस्साच भाषेच्या गमतीचा...आपली मराठी भाषा आहेच केवढी समृध्दय सावरकरांसारख्या थोरामोठ्यांचा वारसा लाभलेली! आपली माय मराठी जेवढी समृध्द आहे तेवढीच गमतीशीर देखील. ही गंमत बोलताना कायम दिसून येते. एखाद्याने चुकून साडी घातली म्हटलं तरी आपण खळखळून हसतो. मग बाजूने एक आवाज येतो ,''अरे साडी घालत नाही , साडी नेसतात''. अशावेळी दोन्ही वक्ते आनंदी होतात. पहिला आपल्यामुळे कोणीतरी हसले म्हणून(वक्ता आपली चूक मान्य करत नाही ही गोष्ट वेगळीच). आणि दुसरा आपण एखाद्याला ज्ञान दिले म्हणून आनंदून जातो(हेतू टोमणा मारण्याचा असेल तर ते त्या व्यक्तीलाच ठाऊक). हा आनंद काही क्षणांचा असतो पण स्मरणीय आठवण बनून जातो.

अशा अनेक आठवणींचा संच असतो प्रत्येकाच्या आयुष्यात. काही गोड काही कटू. कटू आठवणींनी रडू येते. पण तांदूळ निवडताना खडे बाजूला सारल्यावर ज्याप्रमाणे मऊ भात तयार होतोय त्याप्रमाणे आयुष्यातील दु:खाचे खडे बाजूला सारल्यावर उरतात गोड, सुखावह आठवणी. त्यांची माळ विणताना मन प्रफुल्लित होते. आणि जेव्हा अशा गोष्टी आठवतात तेव्हा चेर्हयावर अबसूकच हास्याची कळी उमटते.

आठवणींचा खजिना आहे माझ्याकडे सुध्दा सगळ्यांप्रमाणे. किस्से खूप आहेत आधीच्या दोन आठवणींप्रमाणेय काही नीट आठवत देखील नाहीत. पण जेव्हा मी पहिल्यांदा रांगोळी काढली तो आनंद काही औरच आहे. यशाचे शिखर गाठल्यासारखे वाटले मला. ह्यावर्षीच्या दिवाळीत सुध्दा खरंतर मी रांगोळी काढणार नव्हते कारण आईची ''साऊथ इंडियन स्टाईल'' रांगोळी मला काही केल्या जमेना आणि आईची रांगोळी मला एवढी आवडते की दुसरे काही काढण्याचा मी विचारही करत नाही.

मी ऐकलय की दिवाळी सुख, समाधान घेऊन येते. कदाचित ही दिवाळी आईसाठी समाधान घेऊन आली असावीय कारण अचानक रांगोळी काढण्याची इच्छा निर्माण झाली होती माझ्या मनात.

आई होती फराळाच्या लगबगीत. खरंतर मी आईला मदत करायला हवी होती पण मी मात्र फोन चार्जिंगवरुन काढून युट्यूबवर रांगोळ्या शोधायला लागले. ते पाहून आईला आश्चर्य वाटले पण तिच्या शांततेचे मला जास्त आश्चर्य वाटले. विडिओ पाहून वाटल मनात आले की जी सुचेल ती डिझाईन काढून रांगोळी काढावी. गेले रांगोळीचा डबा घेऊन घराबाहेर आणि त्या नादात घातलेला पसारा पाहून त्या दिवशी आई मला काहीच म्हणाली नाही. रांगोळी सोबतचा माझा खेळ बघून भाऊ माझ्यावर हसत होता. हळूहळू एक एक रेषा जुळवत रांगोळीचे कच्चे काम पूर्ण झाले. आणि वेगवेगळ्या रंगांनी ती आणखीच सुशोभित झाली. पूर्ण रांगोळी पाहिली तर माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. माझा आनंद गगनात मावे ना. तेवढ्यत माझ्या कामाची पोचपावती सुध्दा मला मिळालीय आई बाबा आणि भावाची कौतुकाची थाप मिळाली. शेजारच्या ताईला तर तिच्या पहिल्या रांगोळीची आठवण झाली. पणत्या लावल्यावर त्या प्रकाशात रांगोळी जास्तच चमकून उठली. आई एकदम निश्चिंत झाली. तिने पूर्ण विश्वासाने रांगोळीची जबाबदारी तिच्या मुलीवर सोपवली. मोठे झाल्यासारखे वाटले. जग जिंकल्यासारखे वाटले.

काही मिनिटातच आईच्या फोनवरून स्टेटस अपलोड झाला. अर्थात तिला तिच्या मुलीचे यश सर्यांना सांगायचे होते. खूप रिप्लाय आले. माझ्या या छोट्यशा यशाच्या आनंदात असताना मनात एक विचार आला...मोबाईलमध्ये आठवणी कैद करता येतील पण भावभावना कैद करणे हे मनाचेच काम. स्वरचित हॅशटॅग्जमधून भावना व्यक्त होतीलही पण मनात काय चालू असते ते मनापाशीच.

***-कार्तिकी सुनिल अरकल***
***प्रथम वर्ष– कला***

## i wish to live that way

# एक पत्र...

प्रिय सांची,

खरं तर मी फार अवघडून गेलोय, तुझ्याशी असं पत्राद्वारे बोलताना. हृदयाचे ठोकेही माझे मला ऐकू येतील आता. तू मला रोजच नवेनवे धक्के देत असतेस आणि हे तुला माहित आहे. आपल्यात होणारे मतभेद, छोटे वाद, रुसवे फुगवे आणि या सगळ्याच वर्णन करणारा तुझा 'इरिटेटिंग' हा शब्द माझ्या काळजात थोडीशी धडकीच भरवून गेला आहे. नात्यात बांधल्या गेलेल्या प्रत्येक जोडीला असंच कायम वाटत असतं की आपलं नातं 'जगावेगळं' आहे. याच आपल्या 'वेगळ्या' नात्याविषयी थोडंसं आज मी बोलणार आहे तुझ्याशी.

आपण ज्या दिवशी एकमेकांना 'कुबूल है' म्हणलं तो दिवस तुला आठवतो का गं? त्या दिवशी आपण दोघेही आजारी पडलो होतो. माझं डोकं दुखत होते.दिवसभराच्या धावपळीमुळे आणि तुला फ्लू झाला होता. नाही... त्या 'दिल चाहता हैं' मधल्या 'सुबोध' सारखं नाही सांगते, पण माझ्याकडे त्यावेळेच्या आपल्या बोलण्याचा 'स्क्रीनशॉट' सेव्ह केलेला आहे. हसू नकोस गालातल्या गालात. बहुदा आपल्या सगळ्या गप्पांची सुरुवात तू बनवलेल्या 'आजचे ताजे पदार्थ' या विषयावरून झाली होती. तुझ्या मते त्या दिवशी मफिन्स अगदीच 'हे' झाले होते. म्हणजे तू बनवले होतेस आणि मी मात्र या गोष्टीवर ठाम होतो की तू जे बनवतेस ते छानच असतं. त्या रात्री आपण मान्य केलं आपले नाते 'वेगळ्या' वळणावर येऊन पोहोचलय. आणि मग डेटिंग, मित्र, कपकेक्स, आवडीनिवडी अशा अगदीच जनरल गोष्टींवर आपण गप्पा मारल्या. खरं सांगायचं तर हे सगळं इतक्या लौकर आणि अनपेक्षित झालं की माझं मन हे डेटिंग वगैरे मानायलाच तयार नव्हतं. पण जसजसे दिवस पुढे गेले आणि आपलं नातं अधिक दृढ होत गेलं तसतसा माझा दृष्टीकोनही बदलत गेला. आपल्यातल्या अविश्वसनीय, अतूट बंधांनी माझ्या मनातली जळमटं बाजूला झाली.

आपल्या नात्याला एक वर्ष झालंय आता. आणि मला थोडंस बोलायचय. आपल्याबद्दल. कदाचित वाटेल तुला की मी 'बोअर' करतोय. पण तरीही थोडंसं बोलायचय. गेल्या वर्षभरातल्या आपल्या नात्याच्या अनेक आठवणी आहेत. त्या सगळ्याच मी काही सांगणार नाहीये. कारण त्या आपल्या दोघांच्याही मनात हळुवार कोरल्या गेल्या आहेत. आज मी बोलणार आहे आपल्या भविष्याबद्दल. आपल्या नात्याच्या पुढच्या प्रवासाबद्दल. असा सुंदर प्रवास जो आपल्याला एकमेकांच्या साथीने करायचाय आणि जो मी मनाशी कल्पिलेला आहे.

अर्थातच मला हे माहित्ये की सततच्या सहवासामुळे नात्यातली ओढ थोडीशी कमी होत जाते. पण त्यामुळे मला आपलं भविष्य रंगवणं थांबवायचं नाहीये. मला पुढचं संपूर्ण आयुष्य तुझ्यासोबत घालवायचं. येणारे प्रत्येक चढउतार, खाचखळगे, अवघड वळणं या सगळ्यांवर तुझ्या साथीने चालायचय. पान पिकलं की ते पिवळं पडत जातं पण म्हणून ते गळून पडेपर्यंत त्याचे झाडाशी असलेला ऋणानुबंध कमी होत नाहीत. तसंच आपलं नातं आहे. ते जितकं जुनं होत जाईल तितका त्यातला गोडवा अधिक वाढत जाईल. थोडं पुस्तकी वाटेल तुला माझं बोलणं आणि मला माहित्ये पुढील आयुष्याबद्दल बोलणं तुला फारसं आवडत नाही.

त्यामुळे आपण एकत्र 'जगलेले' क्षणच वेचू. बघूया त्यातून काही गवसतय का.. तुला खंडाळ्याचा ट्रेक आठवतो? आपण केलेला? तुझ्या साथीने मला अशी अनेक शिखरं पार करायची आहेत, डोंगर धुंडाळाचेत. जगातलं आपलं खुजेपण हे डोंगर, दऱ्या, शिखरं आपल्याला दाखवून देत असतात. पण अर्थातच हे डोंगर एकमेकांच्या साथीने पार करायला खूप मज्जा येते. आपल्याला खंडाळ्याला आली तशी. मला वाटतं सहजीवन सहजीवन म्हणतात ते हेच असावं. एकमेकांच्या साथीने अगदी छोटसं कामही मार्गी लावण्यासारखं. तू चीजकेक्स केले होतेस. आठवतंय तुला? ते चीजकेक्स बनवायला ओव्हन कसा मस्त गरम व्हायला लागतो नाही का? म्हणजे मला फारसं त्यातलं काही कळत नाही. पण तो ओव्हन मस्त तापल्याशिवाय केक्स मस्त 'तयार' होऊ शकत नाहीत. मला तुझ्या आयुष्याच्या केकचा ओव्हन बनायचय. आपलं आयुष्य म्हणजे एखाद्या गोड पदार्थाप्रमाणे असावं. गोड साखरेचं प्रमाण योग्य असावं लागतं. अति झालं खाता येत नाही आणि कमी झालं तर गोड लागत नाही तसं.

तुला 'स्कॉटलंड' आवडतं ना खूप? आत्ता शक्य नाही पण पुढे तुझ्यासोबत मला तो सुंदर प्रदेश पहायचय. सूर्यास्ताच्या वेळेला आकाशाच्या कॅनव्हासवर सुंदर रंगांची नक्षी उमटलेली असताना तुझा हात हातात घेऊन एखाद्या हिरवळीवर पडून ते आभाळ न्याहाळायचय. आपण मग एकमेकांशी खूप गप्पा मारू. पण एकही शब्द न उच्चारता. आयुष्यात येणारं प्रत्येक यश आणि अपयश मला तुझ्या जोडीने जगायचंय. आपल्या आई–बाबांनी जगलं तसं. मी त्यांच्याकडे बघूनच लिहितोय हे.

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, होय, मला तुझ्याशी लग्न करायचय.
अर्थातच आपल्या दोघांच्याही वडिलधाऱ्यांच्या साक्षीने. दोन जीवांना
एकमेकांशी बांधणारं ते बंधन अनोखं असतं. नववधूच्या साजशृंगारात सजलेलं
मला तुला पहायचंय. किती गोड दिसशील तू तेव्हा... आपलं घर आपण
आपल्या मनासारखं सजवणं ही भावनाच किती मस्त आहे ग? थोडक्यात सांगू
का? मला आपल्याला एकमेकांची इतकी सवय लागायला हवीये की पुढचं
प्रत्येक पाऊल आपण एकमेकांच्या साथीने टाकावं. अगदी आयुष्याच्या
अंतापर्यंत. मला माहित्ये माझ्या या सगळ्या कल्पना तुला हास्यास्पद
वाटतील. एका क्षणात आयुष्य बदलत नाही, पण त्या बदलाची सुरुवात मात्र
आपण त्या क्षणी घेतलेल्या 'त्या' निर्णयाने होत असते.

आता या सगळ्यात थोडासा ड्रामा यायला थोडंस रडू मात्र नकोस


हा... !!!

(ता.क. दृ तू बनवेलेल मफिन्स अगदीच 'हे' झाले होते हे आता नाकारू
नकोस हा.. तसं तूच म्हणली होतीस तेव्हा... आणि पुरावा आहे माझ्याकडे.
हाSS हाSS हाSSS)

तुझा आणि फक्त तुझाच,

साहिल

**देवदत्त रेगे**
**१२ वी , कला शाखा**



# 'क्रुर वाटाड्या'

शतोश म्हणाला तुझा हृदयस्थ आवाज ऐक आणि तसाच वाग.
पण शत्याशने कधीच सांगितलं नाही की हृदय शत्याशला वश आहे,
तेव्हाही आणि आत्ताही

शत्याशला माहित होतं की मला नेहमीच तुडवायचा होता अनवट माग
पण शत्याशला खात्री होती की मी पुन्हा येईन त्याने ठरवलेल्या वाटेवरच
तेव्हाही आणि आत्ताही

लोकं ओळखतात ना शमीश नसलेल्या मला, अन मारतात खुसखुशीत
गप्पा मी न मिळवलेल्या शवस्तूशच्या
आणि आहे ना शिक्का शत्याशच्याकडे यासाठीही तयार — अपयशाचा

मला कायमच दोनच गोष्टी ठाऊक होत्या मी जिंकेन अथवा शिकेन
पण त्यानेही चंग बांधला अन् वाढवला एक शब्द माझ्या शब्दकोशात
— पराभवाचा

आणि मग आयुष्याचं घड्याळ शत्याशच्या नशीबाला बांधलं गेलं कायमचं
आणि शत्याशच्या वर्तुळाभोवती फिरत राहिलो मी, सरकवत काटे
विजय—पराजयाचे

बहुदा मी एकटाच शत्याशच्या तावडीत, असं वाटलं होतं मला
सुरवातीला
पण मग असंख्य दिसले शकाजवेश वळचणीला होऊन रूप
घडाळ्यातील आकड्यांचे

किती वाजले? असं मी विचारलही अनेकदा त्यांना, पण,......

आधी मी की आधी तू, अहमहमिका लावून दिली शत्याशने
शआमच्यातचश, उंदरांच्या शर्यतीसारखी
आपल्या लढाया आपणच लढायच्या असतात अशा शत्याशच्या सुंदर
विशेषणांनी झाली गत माझी कुरुक्षेत्रातल्या अर्जुनासारखी

तरी बरं त्याच्याकडे श्रीकृष्ण होता त्याला गीता सांगायला, दाखवायला खरा मार्ग अर्जुनाच्या माणूसपणाचा
अहो नाही कसं, श्त्याश्नेही दाखवले की मला दोनच मार्ग — यश आणि अपयशाचे

श्त्याश्ला ना एक कला अवगत होती बहुदा लोकांना झपाटण्याची, अगदी केव्हाही
भविष्याच्या गर्भात असलेल्या नवअंकुरांनाही होते भय, एकच, कायम — श्त्याश्च्या झपाटण्याचे

कोण असावा श्तोश? मला कायम पडायचा प्रश्न श्त्याश्च्या या क्रूर अस्तित्वाचा
अथक परिश्रमाने अखेर मलाही लागला शोध आपल्या सर्वांमधल्या श्त्याश्चा

**—ऋचा दिवेकर**
**द्वितीय वर्ष, कला शाखा.**

# CREATE

The Dreamer was once asked,
"What good do these dreams do?"
The Wanderer softly replied,
"They give me things to look forward to."

When the Wanderer was asked,
"What's the point of wandering?"
The Adventurer replied with,
"It clears the path for pondering."

And then the Adventurer was asked,
"Why would one seek adventure?"
To this, the Finder replied,
"It prevents me from turning into furniture."

And finally the Finder was asked,
"Don't your failures make you feel hollow?"
And the Creator replied,
"Would you prefer it if we were to just follow?"



-इरा घोष
प्रथम वर्ष , कला

# HAS DRAUPADI'S REVENGE BEEN TAKEN?

This world is the same courtroom
Where insolence humiliated her ,
Where everyone stood unnoticed to her holler,
Where every demon enjoyed her squeals,
As if they were feasting on nasty meals....

This world is the same courtroom,
Where every Chaucer's dice is made up of Jarasandha's bones,
Where most of the court men heard her shrieks,
Where near and dear ones stood helplessly,
And events unfolded adversely ....

This world is the same courtroom,
Which consisted of farrago of emotions,
Which witnessed sinister actions,
Which saw a dominating Duryodhan's thigh ,
And machiavellian Shakuni's deceitful eye....

But this world isn't the same courtroom,
Where the Supreme Lord Krishna emerged,
Without heeding the rules of the game,
For saving her from vitally getting embarrased,
And by the eyes of the nasty, brutally chased...

Is this the only 'Draupadi's insult' that had ever taken place ?
Isn't this courtroom still into a barbaric mess?
Aren't there thousands of Dusshasanas roaming around?
Aren't the voices of thousands of Draupadis still making a booming sound ?

Can't humans emerge like the Lord to protect women?
Or are they lost into this 'PALACE OF ILLUSIONS' ?
Or is today's Kurukshetra escalated with only evil men ?
Or is it suffused with only bloodthirsty insinuations ?

It is indeed the same dreadful courtroom ,
Only devoid of the divine soul ....

— तनष्किा मुजुमदार
११ वी ए कला शाखा

# ऐक ना रे माझं

ऐक ना रे माझं
नको रुसून बसू असा

तुझ्याशिवाय मी
म्हणजे जणू आत्म्याविना शरीर
तुझ्या साथीशिवाय
मन सतत होई अधिर

असं एकटं पाडून मला
नको ना दूर जाऊ
दूर लोटून तुझा रूसवा
आपण एकत्र प्रेमाने राहू

पाहुण्यासारखं वागणं तुझं
शोभतं का आपल्या नात्याला
असं का वागतोयस तू
जणू नजर लागली आहे आपल्याला

चुकतो तो माणूसंच रे
मान्य आहे माझ्याकडूनही चुक झाली
पुन्हा पुन्हा माफी मागते तुझी
आता तरी येउदे की हसू गाली

एकत्र मिळवलेलं ते प्रत्येक यश
असं विसरून जातं का कोणी?
श्वासासमान महत्त्व आहे तुझं माझ्यासाठी
कायमच आहे मी तुझी ऋणी

सांग मी काय करू म्हणजे पळून जाईल तुझा रूसवाह
सांग काय करू म्हणजे फुलेल हसू तुझ्या गालीह
अगदी काहीही करायला तयार आहे मी
तुझ्याशिवाय नाही मज कोणी वाली

ऐक ना रे माझं
नको रुसून बसू असा
तू आहेस माझा गाता गळा
नको होउन बसू त्रासदायक घसा!

-तीर्था सामंत.
प्रथम वर्ष, कला
शाखा



# संगीतोत्सव!!!

गीतो क रग न हो तो, नीरस ह येजीवन।
सरगम क सर न छिडेतो, सना ह मन आगन!
हवाओम सगीत ह,
लहरों म सगीत ह,
सगीत ह बाररश की ररमझिम म!

धडकन म सगीत ह,
सासों म सगीत ह,
सगीत ह कदरत क कण कण म!

गहर येररश्तेह, सग रेतेहसतेह,
सख दुःख क सभी मौसम, गीतों म बसतेह,
धीमेसेयादों को धडका जाता ह कोई गीत जब,
साथ साथ गनगनातेहैंयेददल

क्योंकक...

सगीत ददलों का उत्सव ह!
सगीत ददलों का उत्सव ह...उत्सव ह!!!

—मानसी संतोष मनाली पंडित
द्वितीय वर्ष , कला शाखा

# गार्भायातील दीप एक मी

गार्भायातील दीप एक मी, जळते आहेय
माझ्यातील माझीच सावली, छळते आहे.

नकाच शिकवू पुस्तकातले जगणे मजलाय
मरणापलिकडले मी जगणे जगते आहे.

हे माझे नभ, नभांगणी या मुक्त पक्षि मीय
तिमिरांच्या कोंदणी मी तारा, फुलते आहे.

मी कोणाची? मी सर्यांची अन तर्यांचीय
तुझीच बाकी या गणितातून उरते आहे.

नकोच शिकवू हृदयाचा हा ताल मला तू
प्रेमाचे हे गीत विलंबित, गाते आहे.

सरता उरल्या गणगोतांचे झाले ओझेय
मोक्षाची इच्छा सरणावर जळते आहे.

*—जान्हवी नीलिमा देशपांडे*
*११ वी , कला शाखा*

# तुझी माझी जोडी



ओव्हरसाईज्ड बाळ होते मी,
बारीक नाजुकशी तू,
तुझ्या मायेची सावली मला घडवायची...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची !

सैतान होते मी, कडक शिस्तीची होतीस तू,
कसं गं एवढ सगळं जमवून घेतलंस तू?
सलाम तुझ्या कारकिर्दीला, उत्तम सारं तू जमवायचीस...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

''मला बेटा बोल'' हा अट्टहास मी कधी सोडलाच नाही,
तरीही तितक्याच आपुलकीने लाड केलेस थकून घरी येऊनही
बसते मी जेव्हा निस्तब्ध आज, होते इच्छा तुझ्याशीच बोलायची...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

व्हायचे तुझ्याशी वाद रोजच्या वेण्यांवरून
रिबनला एकसमान फुलं काढ ' बसायची मी हट्ट धरून,
रोजचे हे असूनही, थांबायचीस तू माझ्यासाठी जेवायची...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

इच्छा व स्वप्नांना दिलीस तू योग्य दिशा,
वठणीवर आणलस मला, देत शिक्षेवर शिक्षा
कितीही मी मार खाला, तरी काळजी असायची तुझ्या वाढलेल्या बी. पी. ची...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

चित्रकलेत बारकाईने जसे रंग तू भरायचीस,
त्याच बारकाईने तू मला सुद्धा सांभाळायचीस ..
कुशीत तुझ्या जी सुरक्षितता भासायची...
काय गं सांगू...तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

नोकरीपासून सारं काही सोडलंस, फक्त तू आमच्यासाठी
प्रश्न पडतो आजही मला, कधी जगली होतीस का गं तू स्वतःसाठी?
निरंतर आम्हाला आधार देत असायचीस,
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

यशाचे शिखर चढायला तूच नाही का शिकवले?
मग याच यशाच्या पायऱ्या चढताना का देवाने तुला भुर्रकन नेले?
आठवतात तुझी स्वप्नं कसे तू आमच्यात त्यांना बघायची...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

आठवतात ते सोनेरी दिवस, आठवतात ते अमूल्य क्षण,
जेव्हा तुझ्यामुळेच भरलेले असायचे माझे आनंदाचे अंगण...
याच अंगणात राहून गेली एकत्र मज्जा करायची...
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची!

तुझी आहे मी, तुझ्यामुळे आहे मी,
तुझ्या पावलावर पाऊल ठेऊन धीटपणे चालणार आहे मी...
आशीर्वाद तुझा सदा असुदे व तू सुद्धा कायमची
तुझी अन् माझी जोडी सुरेख रमायची..

**-विभा सावंत**

*ख सर्व मातांना (सख्या, सावत्र, तृतीयपंथी) हृदयापासून समर्पित ,*

# मराठी वाङ्मय मंडळ कमिटी २०१९-२०



भव्य विरा

प्रमुख समन्वयक

व्यवस्थापन



अनुष्का परब

उपसचिव व्यवस्थापन



ऋतुजा पाटील

मुख्य सचिव



संजना रत्नपारखी

उपसचिव कार्यक्रम



शौमिक म्हाटे

प्रमुख समन्वय

कार्यक्रम



द्रष्टि शहा

खजिनदार



हर्षदा अभ्यंकर

संपादिका

## कार्यक्रम



दुर्गा येसादे

साहित्य विभाग प्रमुख



ऋचा दिवेकर

नृत्य विभाग प्रमुख



प्रसाद चव्हाण

नाट्य विभाग प्रमुख



विभा सावंत

कला विभाग प्रमुख



मानसी पंडित

संगीत विभाग प्रमुख

## व्यवस्थापन



ममता दलाई

मार्केटींग

विभाग प्रमुख



अर्चना ताटिकोंडा

छायाचित्रण

विभाग प्रमुख



जान्हवी अय्यर

टेक्निकल्स

विभाग प्रमुख



प्रिशी जैन

जनसंपर्क

विभाग प्रमुख



ॲबीगेल फर्नांडिस

लॉजिस्टिक्स

विभाग प्रमुख

